# श्री. पी. व्ही. नरसिंहराव यांच्या कार्यकाळातील भारत-अमेरिका संबंधाचे अध्ययन

प्रा. डॉ. गणेश बी. खुणे राज्यशास्त्र विभाग प्रमुख महात्मा ज्योतिबा फुले कला महाविद्यालय आष्टी, जि. गडचिरोली

**प्रस्तावना:**१९८९-९० मध्ये सोव्हिएट संघाच्या विघटनाने शितयुद्धाची समाप्ती झाली. या घटनेने आंतरराष्ट्रीयव्यवस्था आणि राजकारण यामध्ये आमुलाग्र परिवर्तन झाले. अशा बदललेल्या स्थितीत श्रीपी. व्ही. नरसिंहराव यांनी भारताचे नववे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. श्रीपी. व्ही. नरसिंहराव हे साधारण व्यक्तिमत्वाचे धनी होते.त्यांच्यामागे नेहरु-गांधी सारख्यांचे व्यक्तिवलय नव्हते.सोबतच त्यांचे व्यक्तिमत्वही अद्वितीय नव्हते.

आंतरराष्ट्रीय जागतिक व्यवस्थेत शितयुद्धाच्या समाप्तीनंतर एक बलशाली राष्ट्रम्हणून सोव्हिएट संघाचा अंत झाला व द्विधृवीय विश्व व्यवस्थेचा अंत होऊन एक बलशाली राष्ट्र म्हणून अमेरिकेच्या नेतृत्वात एकधृवीय विश्व व्यवस्थेचा उदय झाला. अशा बदललेल्या परिस्थितीत भारतीय विदेश निती कशी असेल किंवा कशी असली पाहिजे ? हा प्रश्न मनाला नेहमी भेडसावत होता. याच प्रश्नाने प्रेरित होवून सदर विषयावर संशोधन लेख लिहिण्याची प्रेरणा मनात निर्माण झाली.

**संशोधनाचा उद्देश**:-पंडीत नेहरू आणि इंदिरा गांधी यांच्या तुलनेत पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांचा आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास विस्तृत नाही.बदललेली नवीन जागतिक व्यवस्था आणि आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये पी. व्ही. नरसिंहराव स्वतंत्र आणि अलीप्ततावादी धोरण टिकवून ठेवतील काय ? हा प्रश्न शंका निर्माण करतो. कारण पी. व्ही. नरसिंहरावांचे नेतृत्व, पंडीत नेहरू व इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाच्या तुलनेत दुय्यम दर्जाचे आहे. या दुय्यमदर्जाच्या व्यक्तीमत्वामूळे पी. व्ही. नरसिंहराव आंतरराष्ट्रीय दबावामध्ये येण्याची दाट शक्यता होती. अश्या परिस्थितीत पी. व्ही. नरसिंहराव अलीप्ततावादी धोरण टिकवून ठेवतील काय ?किंवा त्यांच्या काळातील भारत-अमेरिका संबंध हे धोरण टिकवून ठेवूनच प्रस्थापित केले गेले काय ? हा संशोधनाचा विषय आहे.

**संशोधन पद्धती** :-प्रस्तुत शोध लेखासाठी ऐतिहासिक, विश्लेषणात्मक व मुल्यमापणात्मक पद्धतीचा वापरकरण्यात आलेला आहे. सदर शोध निबंध हा दुय्यम सामग्रीवर आधारीत आहे.

१९८२ मध्ये इंदिरा गांधी व अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रिगन यांनी परस्परांत आर्थिक, सांस्कृतिक व वैज्ञानिक संबंधात वाढ केली. त्यांने या क्षेत्रातील भारताच्या प्रगतीला अधिक गती प्राप्त झाली. इंदिरा गांधी यांच्या काळात पी. व्ही. नरसिंहराव हे विदेश मंत्री होते. त्यांनी अमेरिकेत अमेरिकेचे विदेशमंत्री **एडमंड मरफी** यांच्या सोबत चर्चा केली. याबरोबरच १९८५ मध्ये श्री राजीव गांधी यांच्या यशस्वी अमेरीकन दौऱ्यामुळे संशोधन व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात चर्चा करून ९ ऑक्टोबर १९८७ मध्ये अमेरिकेने भारतासोबत सूपर कॉम्प्यूटरच्या करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

शितयुद्धाच्या समाप्तीनंतर बदललेल्या जागतिक व्यवस्थेने दोन्ही देशांना आपल्या द्विपक्षीय संबंधाचे पुनर्मुल्यांकन करण्याची संधी मीळाली. भारताने स्विकारलेल्या आर्थिक उदारीकरणाच्या उपायांचे अमेरिकेने स्वागत केले व या प्रक्रियेला अधिक उत्साहित करून बहूपक्षीय संस्थांकडून कर्ज मिळविण्याच्या भारताच्या मागणीला पूर्ण समर्थन केले. भारत व अमेरिकेचे उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे व्यापार आणि भांडवल गुंतवणूक होय. १९९४ व १९९५ मध्ये वाणिज्य तथा आर्थिक क्षेत्र भारत व अमेरिकेच्या सहयोगाचे प्रमुख तत्व बनले.

मे १९९४ मध्ये पी. व्ही. नरसिंहरावांनी अमेरिकेची यात्रा केली. दोन्ही देशात नवीन अध्याय सूरू करण्याच्या उद्देशाने ८ वर्षानंतर भारत अमेरिका संयुक्त आयोगाचे पुन:र्जिवन करणे व दोन्ही देशांमध्ये सैनिक-असैनिक आणि सेवास्तर यामध्ये सहकार्य वाढविण्यासाठी निर्णय घेतला.

इकडे अण्वस्त्र अप्रसार करारावर स्वाक्षरी करण्यासाठी अमेरिकेचा भारतावर निरंतर दबाव वाढत चालला होता. अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने भारताच्या इस्त्रो व रशियाच्या ग्लावकोसमोस याविरूध्द प्रतिबंध लावण्याची घोषना केली.

अमेरिकेत बसून भारत विरोधी षडयंत्र करणाऱ्या संस्थांना राष्ट्रपती क्लीटन यांनी पत्र लिहीले. या संदर्भातील पहिले पत्र अमेरिकास्थीत काश्मीर अमेरिकी कौन्सीलचे सर्वेसर्वा गुलाबनभी फाईला लिहिले व काश्मीरात शांतता ठेवण्यास सांगीतले. दुसरे पत्र डेमॉक्रेटीक पार्टीचे सिनेटर गॅरीकॉर्नटीडला यांच्या उत्तराच्या स्वरूपात लिहीले. त्यात त्यांनी पंजाबातील शिखांच्या मानवाधिकाराच्या सुरक्षीतेसाठी लिहीले होते. या पार्श्वभूमिने भारत-अमेरिका संबंधात तनावाचे वातावरण निर्माण झाले.

**विज्ञान-तंत्रज्ञान व भारत-अमेरिका संबंध** १९९२ मध्ये बडोदा येथे २ ते ५ जानेवारी पर्यंत अधिवेशनाचे आयोजन केले गेले होते. या अधिवेशनाचे उद्घाटन पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांनी केले.या अधिवेशनात भारतासोबत जगातील ३५०० विदेशी वैज्ञानिकांनी सहभाग नोंदवला. या अधिवेशनात लोकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी संशोधन व शिक्षणाच्या दृष्टीने एक राष्ट्रीय केंद्र स्थापण्याची शिफारस केली गेली.**डॉ. वसंत गोवारीकर** पंतप्रधानाचे विज्ञान व तंत्रज्ञानाचे सल्लागार होते. ते म्हणतात,"आज आपल्यासमोर लोकसंख्येचा प्रमुख प्रश्न आहे. यावर उपाय शोधण्यासाठी विज्ञान व व्यावसायिक या दोघांनाही आपसात शिकण्याकरीता खूप काही आहे. या अधिवेशनात शास्त्र, विकास, लोकसंख्या या तीन गोष्टीवर भर दिला गेला."

हॉयपरप्लॉन प्रोजेक्टच्या संदर्भात**डॉ. अब्दूल कलाम** यांनी म्हटले होते की,"दोन विकसीत देश भारताच्या या योजनेला सहकार्य करू इच्छीत आहेत. या सहकार्य व प्रेरणेने भारताची स्वताची अंतरिक्ष योजना पूर्णत्वास जाण्याने भारताच्या स्थितीत सूधारणा होण्याची शक्यता आहे." हॉयपरप्लॉनची संकल्पणा १९९२ मध्ये अस्तीत्वात आली होती. ही संकल्पणा वास्तवात आल्यास ते तंत्रज्ञानातील एक प्रकारचे आश्चर्य ठरले असते. कारण हे यॉन धावपट्टीवरून उडान घेऊ शकले असते व अंतरिक्षकक्षामध्ये सोडल्यानंतर ते पून्हा जमिनीवर परत येऊ शकले असते.

भारताच्या मिसाईल निर्मितीच्या संदर्भात डॉ. कलाम म्हणाले होते की,"जमीनीवरून हवेत मारा करणाऱ्या त्रिशूल क्षेपणास्त्राची या वर्षाच्या शेवटपर्यंत निर्मिती केली जाईल अशी अपेक्षा आहे. अग्नी मिसाईलची पहिली यशस्वी उडान १९८९ मध्ये केली गेली. परंतु अनेक देशांच्या वाढत्या दबावाने नंतर यांचे परिक्षण केले गेले नाही. या मिसाईलची मारक क्षमतासूमारे २००० की.मी.पर्यंतचीहोती."

८ मे १९९२ मध्ये सी.आय. चे अध्यक्ष **राबर्ट गेट** यांनी अमेरिकेच्या कॉंग्रेस समोर भारत व पाकिस्तान या दोन्ही देशांवर आरोप लावतांना असे म्हटले की, हे दोन्ही देश मध्य पूर्वेच्या राष्ट्रांना अण्वस्त्र तंत्रज्ञान हस्तांतरण व तंत्रज्ञानाची देवाण घेवाण करण्याचे मुख्य स्त्रोत बनले आहेत. भारत आणि पाकिस्तान या दोन देशांजवळ अण्वस्त्र व दूरपर्यंत मारा करणारे क्षेपणास्त्रे आहेत व दोन्ही राष्ट्र अण्वस्त्र निर्मितीच्या स्पर्धेमध्ये लागले आहेत.

परंतु भारतीय विदेशमंत्रालयाच्या प्रवक्त्याने यावर टिका केली व म्हटले की, भारताच्या शांतीपूर्ण कार्यक्रमाची अनेक आंतरराष्ट्रीय वैज्ञानिकांनी प्रशंसा केली आहे. भारताने यासंदर्भात आपले विचार निरंतर जगासमोर ठेवले आहेत.

रॅकेट तंत्रज्ञानयासंदर्भात पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव व अमेरिकेचे परराष्ट्रीय सचिव जेम्स बेकर यांच्यात चर्चा होवून, त्यात हे तंत्रज्ञान भारताला देण्याची तयारी अमेरिकेने दर्शवली. परंतु जेम्स बेकरने यावर काही मर्यादा लावल्या. मात्र याचा खुलासा त्यांनी केला नाही. राजकीय वर्तुळातून असे तथ्य समोर आले की, भारताने सी.टी.बी.टी च्या करारावर स्वाक्षरी करावी व आपला रॅकेट विकसीत कार्यक्रम स्थगीत करावा, कारण त्याचा उपयोग नागरीक क्षेत्रासाठी करतांना सैनिकी उपयोगापासून त्याला अलीप्त करता येत नाही. पूढे बेकर म्हणाले, जर अमेरिकेच्या कॉंग्रेसने रॅकेट तत्रज्ञान हस्तांतरणाला परवानगी दिली तर अमेरिका तंत्रज्ञान भारताला देण्यासाठी तयार असेल. अमेरिकेने भारताच्या इस्त्रो व रशियाच्या आंतरिक संघटनेची नाकेबंदी केली होती. त्या नाकेबंदीमध्ये भारत व अमेरिकासंबंधामध्ये दुरावा निर्माण झाला.

अमेरिका व सोव्हिएट संघ या दोन्ही देशांच्या संस्थांवर (एम.टि.सी.आर)**मिसाईल टेक्नालॉजी कन्ट्रोल रेझीमचे** उल्लंघन करण्याचा आरोप लावून बंदी घातली गेली. अमेरिकेच्या सिनेटद्वारे एक हप्त्यापूर्वी परकीय सुधार कायदा १३ मतांनी मंजूर केला गेला होता. त्या कायदयाद्वारे पूर्ण सोव्हिएट गणराज्यातील कोणत्याही नवीन देशावर अमेरिका प्रतिबंध लावू शकतो जर तो देश इतर देशांना अण्वस्त्र निर्मितीत मदत करेल. उदा. रशियाने भारताला रॅकेट तंत्रज्ञान देण्याच्या घोषणेनंतर या दोन्ही देशांच्या अंतरिक्ष संस्थांवर अमेरिकेने प्रतिबंध घातले.

**भारताला अमेरिकन मदत** अमेरिकेच्या डेमॉक्रेटीक पक्षाचे सीनेटर **श्री चार्ल्स विल्सनने** १२ जून १९९२ ला अमेरिकन कॉंग्रेससमोर परकीय मदतीचा अहवाल सादर केला. या अहवालानूसार भारत व पाकिस्तान या दोन्ही राष्ट्रांच्या अण्वस्त्र चोरी कार्यक्रमावर सारख्या नजरेने अमेरिका पाहते. एकुणच अण्वस्त्र कार्यक्रमाने पाकिस्तानला मदत मिळत नसेल तर भारतालाही मदत मिळणार नाही अशी योजना तयार केली गेली. परंतु यास अमेरिकेच्या कॉंग्रेसने नामंजूर करून यात बदल करण्याची शिफारस केली. या बदलांनी भारताला होत असलेल्या मदतीवर कोणताही परिणाम होणार नाही. विल्सनद्वारे प्रस्तुत बिल प्रेसलर कायदयाप्रमाणे एक नवीन संशोधन होते.प्रेसलर कायदयाद्वारे पाकिस्तानला देण्यात येणारी मदत थांबविली गेली.विल्सनद्वारेकेल्या गेलेल्या सुचनेनूसार अमेरिकन राष्ट्रपतिद्वारे कॉंग्रेसला असा अहवाल सादर केला गेला की, भारताजवळ जिवंत अण्वस्त्रे आहेत किंवा नाही हे स्पष्ट केले पाहीजे.

अंतरिक्ष कार्यक्रम भारताला आर्थिक दृष्टीने परवडणारा नसला तरी तो अंमलात आणण्यासाठी भारताद्वारे निरंतर प्रयत्न केले जात आहेत.२८ मे १९९२ मध्ये भारताने आपल्या अग्नी क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली.यामुळे भारताच्या कार्यक्रमाला यश प्राप्त झाले.

**भारत-अमेरिका संयुक्त नाविक अभ्यास** भारत-अमेरिका संयुक्त नाविक अभ्यासाने भारताच्या नाविक क्षेत्रातील गैरसमजूती दुर होऊन त्याने भारताच्या सकारात्मक वृत्तीत वाढझाली व त्याने दोन्ही देशांचे संबंध सुदृढ होतील अशी अपेक्षा भारतीय माजी नौदल व्हाइस चीफ **के.के. नायर**यांनी व्यक्त केली.

संयुक्त नाविक अभ्यासाने भारतीय नौदलाच्या व्यायसायिक दृष्टीकोणात, सक्रीय सैनिकी विचारात, मोठा बदल झाला. अमेरिकेचे नौदल अधिक प्रगत असल्याने या अभ्यासानेभारताला अधिक फायदा होणार होता. एकुणच जोपर्यंत दोन्ही देश आपले आपसी संबंध मुक्त करीत नाही तोपर्यंत नाविक कार्यक्रमातंर्गतशंका निर्माण होणे स्वाभाविक आहे.

ऑस्ट्रेलिया, फ्रांन्स, ब्रिटन यांच्या नौदलासोबत भारताने संयुक्त कवायतीचा अभ्यास केला व त्याने भारताचा फायदा झाला. भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताच्या नौदलातील जहाजांना राष्ट्रकूल देशांच्या त्रिकोमाली येथे आयोजित वार्षिक अभ्यासात निरंतर बोलावले जाते. १९९२ पासून सरकारने इतर देशांच्या नौदलाशी संबंधित अनेक विषयावर सहकार्य व सहभाग देण्यावर मंजूरी दिली.

**भारत-अमेरिका सूरक्षा संबंध** पूर्व आशियामध्ये अमेरिकेला भारत एक बलशाली राष्ट्र म्हणून पाहीजे होते, की ज्यामुळे याठीकाणी होणाऱ्यालहान मोठ्या घडामोडींवर प्रतिबंध लावता येईल.परंतु भारताला नेहमी अडचणीत आणणाऱ्या दहशतवादयांच्यासमर्थयांच्या निवारणासाठी भारत यशस्वी झालेला नाही.**प्दकपंद क्मिदबम त्मअपमू**या मासीकामधिलमुलाखतीत एका निवृत्त अधिकाऱ्याने म्हटले की, "दोन्ही देशातील मैत्री संबंधाने संशयाचे वातावरण दुर होइल अशी अपेक्षा आहे. कारण संशयाच्या वातावरणाने दोन्ही देशातील संबंध कधिच मोकळेपणाचे नव्हते." तथापि दोन्ही देशांच्या सैनिक-उपसैनिक प्रमुखांची आपसात चर्चाझाली. अमेरिकेच्या सैनिकी पथकाने भारतीय सैनिकी अभ्यासात सहभाग घेण्याची संमती दिल्याने दोन्ही देशांच्या संबंधात सुदृढता निर्माण झाली.

उपरोक्त सैनिकी सहकार्याबद्दल **जनरल डिसूजा** म्हणतात की, "या सर्व गोष्टीमुळे अमेरिकाभारतावर एन.पी.टी. व एन.टी.सी.आर. लागू करण्यासाठी दबाव आणण्याचा प्रयत्न करीत आहे. सोबतच रशियाने भारताला शस्त्र आणि औद्योगिकीकरणविषयक वस्तुंचा पुरवठा करु नये म्हणून अमेरिकेद्वारे निरंतर दबाव आणल्या जात आहे.कारण सोव्हिएट संघाच्या पतनाने त्याच्या झालेल्या विभीन्न लहान लहान देशांकडून या वस्तू निर्माण करणे शक्य नाही. परिणामता भारत आपली आर्थिक स्थिती व भविष्याचा विचार करुन आपले पाऊल उचलत आहे.

**अण्वस्त्र आणि शस्त्र स्पर्धेच्या बाबतीत भारत-अमेरिकेचे मत** भारताचे पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहरावांनी१६ मे १९९४ ला न्युयार्कमध्ये परमाणू अप्रसार करारासंबंधी बोलतांना म्हटले की,"भारताच्या पृथ्वी क्षेपणास्त्राच्या प्रक्षेपण करण्याच्या निर्णयाने भारतीय धोरणावर कोणत्याही प्रकारचे परिणाम होणार नाही. सोबतच अमेरिकेने ठेवलेल्या प्रस्तावानुसार भारत व पाकिस्तान यांचे संबंध दुरुस्त करण्यासाठी संयुक्त राष्ट्र परिषदेच्या ५ सदस्यांसोबत अण्वस्त्र अप्रसार संधिवर चर्चा केली.

**भारत-अमेरिकेची पाकिस्तान संबंधी भूमिका** प्रथम अमेरिकेने भारताला पूर्व आशियामधील आपला मित्र समजले व भारतासोबत मित्रतापूर्ण संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांच्या या अपेक्षा भारत पूर्ण करू शकला नाही. त्यामुळे पुर्व आशियामध्ये आपले अधिपत्य स्थापित करण्याकरीता अमेरिकेने पाकिस्तानला आपला जवळचा मित्र समजले. तेव्हापासून भारत व अमेरिका संबंध नेहमी अविश्वासाचे राहिले आहेत. अमेरिकेद्वारे पाकिस्तानला निरंतर शस्त्रास्त्र पूरवठा केला जात आहे. याबाबतीत भारताने शंका व्यक्त केली आहे. आणि त्यामुळे भारत-पाक संबंधामध्ये अधिक तनावाची स्थीती निर्माण झाली. भारताचा विकास व विस्तार होऊनये यासाठी अमेरिकेद्वारे नेहमीच पाकिस्तानला आर्थिक व लष्करी मदत देण्याच्या धोरणाचा अवलंब केला. परंतु भारताने अलिप्ततावादी धोरणाचा स्वीकार केल्याने भारतावर त्याचा कोणत्याही प्रकारचा परिणाम होणार नाही. पाकिस्तानद्वारे निरंतर भारताची निंदा सूरू आहे. अमेरिकेच्या विरोधाला न जूमानता पाकिस्तानने अण्वस्त्र बनवण्याची महारत प्राप्त केली. अमेरिकेकडून १६ एफ. विमान खरेदी करून आपल्या आक्रमण सामर्थ्यात वाढ केली. त्यामुळे भारत-पाक संबंधामध्ये अधिक तनावाचे वातावरण निर्माण झाले.स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारताला आपला विकास झपाट्याने करण्यासाठी अमेरिकेची मदतीची गरज होती तेव्हा अमेरीकेकडून मदत मिळाली नाही व रशियाच्या मदतीने भारताने भिलाई येथे पोलाद कारखाना सूरू केला.

अण्वस्त्राचा वापर होऊ नये म्हणून परस्पर सहकार्याची आवश्यकता आहे. याद्वारेच अण्वस्त्र अप्रसार करार व निशस्त्रीकरण करण्यासाठी बहूपक्षीय लेनदेण करण्यावर भर दिला. अण्वस्त्र शक्ती आणि परिक्षणावर बंदी घातली जाईल तेव्हा जगातील महाविध्वंशक शस्त्र नियंत्रण करण्यावर यश प्राप्त होइल याची पी. व्ही नरसिंहराव यांना खात्री होती. त्याने जगात शांती, सुव्यवस्था, स्वातंत्र्य व समता प्रस्तापित होईल.

अयोध्या प्रकरण व बॉम्बस्फोट प्रकरणाने देशात अस्थीर परिस्थिती निर्माण झाली. त्याचा भारताच्या गुंतवणूकीवर परिणाम झाला.भारताच्या औद्योगिकीकरणासाठी निरंतर प्रयत्न केले जात आहेत. परंतु पी. व्ही. नरसिंहराव यांनी आपल्या अण्वस्त्र धोरणात बदल केला नाही. भारत शस्त्रसज्ज होवूनये या मंशेने अमेरिका पाकिस्तानला निरंतर मदत करीत आला आहे. त्यामुळे काश्मीरमध्ये अजूनही पाक समर्थक दहशदवाद वाढत आहे आणि अमेरिका मात्र कोणतीही कार्यवाही न करता दूर आहे.१९९४ मध्ये पी.व्ही. नरसिंहराव जेव्हा अमेरिकेला गेले तेव्हा अमेरिकेचे उर्जा सचिव **कर्नल इझेल ओ. लेरी**. यांच्यासोबत उर्जा संबंधी झालेल्या करारावर केंद्रीय उर्जामंत्री **साळवे**, पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्री**कॅप्टन सतिश शर्मा**, कोळसा राज्यमंत्री **अजित कुमार पांजा**, अपारंपारिक उर्जामंत्री **एस. कृष्णकुमार**, व पर्यावरण खात्याचे मंत्री **श्रीकमलनाथ** यांनी साक्षऱ्या केल्या. हा करार भारत-अमेरिका संबंधाचे परमोच्च बींदू आहे व ईतीहासातील हे एक सोनेरी क्षण आहे.

पतंप्रधान पी.व्ही. नरसिंहरावांच्या अमेरिकन यात्रेने दोन्ही देशातील संबंध अधिक मजबूत व सहकार्याचे असावे अशी अपेक्षा व्यक्त केली. आजच्या वर्तमानातील संबंध भविष्यात अधिक मजबूत होण्याची शक्यता आहे. उदा. उद्योग, व्यापार, कृषी, विज्ञान, उच्च शिक्षण, तंत्रज्ञान इत्यादी. या गोष्टीकडे लक्ष दिल्या गेले.

मानवी अधिकारासंबंधी पंतप्रधान महोदयांनी म्हटले की,"मानवी अधिकारांचे हनन दहशतवादाने होत आहे. त्यामुळे मानवी अधिकारांच्या संरक्षणाचा ज्वलंत प्रश्न लोकतांत्रीक राष्ट्रांसमोर निर्माण झाला आहे." सोव्हिएट रशियाचे रॅकेटविषयक क्रॉयोजेनिक इंजीन व तंत्रज्ञान भारताला होऊ नये अशी भूमिका अमेरिकेने घेतली. परिणामतापूनश्च भारत व अमेरिका संबंध पूर्णता सहकार्य व सामंजश्याचे न राहता त्यात कटूता निर्माण झाली.

श्री **वी.पी.दत्ता** यांनी भारत अमेरिका संबंधाच्या बाबतीत म्हटले की, "भारताचे अमेरिकेसोबतचे संबंध एकसारखे नाहीत. ते कधी अधिक सुखद तर कधी अधिक दुखद आहेत."

**सारांश** :-अण्वस्त्र कार्यक्रम व आर्थिक धोरण हे दोन्ही मूद्दे भारत-अमेरिका संबंधामध्ये तनाव निर्मितीसाठी जबाबदार आहेत. सोबतच अमेरिकेच्या मुक्त बाजार अर्थव्यवस्थेला अधिक स्कोप आहे. परंतु भारतात अमेरिकन व्यापारी साम्राज्याला प्रवेश मिळत नाही. त्यामुळे अमेरिका व भारत यांचे आर्थिक संबंध व दृष्टीकोण विभीन्न आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत घूसखोरी करण्यासाठी अमेरिकेकडून नेहमी दबाव येत असतो. यामुळे दोन्ही देशांमध्ये तनावाचे वातावरण निर्माण झाले. परंतु भारताने अमेरिकेशी तनाव व संघर्ष दूर सारून सहकार्यामध्ये वाढ करण्यावर भर दिला. अकारणशस्त्रुत्व, जनतेमध्ये दिशाभूल करणारा प्रचार, मुलभूत हितसंबंधाचा विचार न करणे हे विनाशाला आमंत्रण देणारे कारक सिद्धझाले आहेत. त्यामुळे या सर्व दोषांना दूर करून तटस्थ वृत्तीने राहणे नेहमी भारताच्या हिताचे आहे.

**संदर्भ ग्रंथसूची** १) डॉ. फाडियाबी.एल.,'आंतरराष्ट्रीय राजनिति'.
२)श्रीवेदालंकार हरिदत्त,आंतरराष्ट्रीय राजनिति.
३) अग्रवाल आर. सी.,भारत की विदेशनिती.
४) डॉ. वर्मा दिनानाथ, भारत और विश्व राजनिति.
५) प्रा. देशपांडे श्रीकांत, भारताची विदेशनिती.
६)Kundra J. C.,Indian Foreign Policy.
8)Parmeshwaran C., Neharus Foreign Policy-X-Rayed.
9)Kennam G.F., Realities Of American Foreign Policy.
**Periodicals**1-Economic &Political Weekly 1992.
2-Comptation Success Reviw, Ed.
3- Ashian Recorder-1992/93/94.
4-Democretic World.
5-Hindustan Times New Dellhi.
7-Dulls,Eleanor, American Indian Foreign PolicyIn The Making.